06 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांत शिवाजी विद्यापीठ कायम

## केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२३) मध्ये शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान कायम राखले आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी ही माहिती दिली.



राष्ट्रीय पातळीवरील या महत्त्वाच्या क्रमवारीमध्ये सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत वाढूनही शिवाजी विद्यापीठाचे या क्रमवारीतील स्थान फारसे विचलित झालेले नाही. तथापि, वर्षागणिक वाढणारी स्पर्धा आणि बदलते निकष पाहता विद्यापीठाचे स्थान उंचावण्यासाठी कोणकोणत्या निकषांवर अधिक काम करावे लागणार आहे, याविषयी सर्व संबंधित घटकांना अवगत करण्यात येईल. **- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के**

डॉ. देशमुख म्हणाले, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सन २०२३ साठीची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी जाहीर केली. २०१६ पासून ही क्रमवारी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षी या क्रमवारी देशभरातील अवघ्या ३५६५ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या, तर २०२२ मध्ये ५५४३ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ १०१-१५० या बँडमध्ये होते. यंदा २०२३ मध्ये देशभरातील एकूण ८६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्यानंतरही शिवाजी विद्यापीठाने १५१-२०० बँडमध्ये देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान पटकावले आहे. राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधनपर व व्यावसायिक कृतिशीलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय या निकषांवर क्रमवारी आधारित आहे.

06 JUN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशातील २०० शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठ

## केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्यावतीने एनआयआरएफ मानांकन जाहीर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने सोमवारी जाहीर केलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२३) मध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान कायम राखले आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी ही माहिती दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने २०२३ साठीची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी जाहीर केली. पहिल्या वर्षी अर्थात २०१६ मध्ये या क्रमवारी देशभरातील अवघ्या ३५६५ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. गत वर्षी ५५४३ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या, त्यावेळी शिवाजी विद्यापीठ १०१ ते १५० या बँडमध्ये होते. यंदा सन २०२३ मध्ये देशभरातील एकूण ८६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्यानंतर सुद्धा शिवाजी विद्यापीठाने १५१ ते २०० बँडमध्ये देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान पटकावले आहे.



राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधनपर व व्यावसायिक कृतीशीलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय या निकषांवर क्रमवारी आधारित आहे. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याबरोबरच संशोधन संस्था, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर व नियोजन, वैद्यकीय, दंतवैद्यकीय, कायदा, कृषी व कृषीपूरक क्षेत्रे आणि नाविन्यता या क्षेत्रांतील शैक्षणिक संस्थांचाही या क्रमवारीमध्ये समावेश आहे.

**बदलणाऱ्या निकषातही विद्यापीठाचे स्थान कायम**

राष्ट्रीय पातळीवरील क्रमवारीमध्ये सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत वाढूनसुद्धा शिवाजी विद्यापीठाचे या क्रमवारीतील स्थान फारसे विचलित झालेले नाही. तथापि, वर्षागणिक वाढणारी स्पर्धा आणि बदलते निकष पाहता विद्यापीठाचे स्थान उंचावण्यासाठी कोणकोणत्या निकषांवर अधिक काम करावे लागणार आहे, याविषयी सर्व संबंधित घटकांना प्रशिक्षण दिले जाईल.

**- डॉ. दिगंबर शिर्के** (कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ)

0 6 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आघाडीच्या २०० संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठ

## 'एनआयआरएफ रँकिंग' जाहीर; संस्थांची संख्या वाढली, तरी स्थान कायम

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी जाहीर केलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२३) मध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान कायम राखले आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी त्याबाबतची माहिती दिली.

सन २०१६ पासून 'एनआयआरएफ' क्रमवारी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षी अर्थात सन २०१६ मध्ये या क्रमवारीत देशभरातील अवघ्या ३५६५ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. गेल्या वर्षी म्हणजे सन २०२२ मध्ये ५५४३ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ १०१-१५० या बँडमध्ये होते. यंदा सन २०२३ मध्ये देशभरातील एकूण ८६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्यानंतर सुद्धा शिवाजी विद्यापीठाने १५१-२०० बँडमध्ये देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान पटकावले असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याबरोबरच संशोधन संस्था, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर व नियोजन, वैद्यकीय, दंतवैद्यकीय, कायदा, कृषी व कृषीपूरक क्षेत्रे आणि नावीन्यता या क्षेत्रांतील शैक्षणिक संस्थांचाही या क्रमवारीमध्ये समावेश आहे.

### या निकषांवर ठरली विद्यापीठाची क्रमवारी

- अध्यापन-अध्ययन प्रक्रिया
- संशोधनपर व व्यावसायिक कृतिशीलता
- विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण
- महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी केलेले प्रयत्न
- विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय



### गेल्या चार वर्षांतील चित्र

| वर्ष | क्रमवारीतील शैक्षणिक संस्थांचा सहभाग | रँकिंग बँड |
|---|---|---|
| २०२३ | ८६८६ | १५१-२०० |
| २०२२ | ५०४३ | १०१-१५० |
| २०१६ | ३५६५ | २८ |

"या महत्त्वाच्या क्रमवारीमध्ये सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत वाढून सुद्धा शिवाजी विद्यापीठाचे स्थान फारसे विचलित झालेले नाही. तथापि, वर्षागणिक वाढणारी स्पर्धा आणि बदलते निकष पाहता विद्यापीठाचे स्थान उंचावण्यासाठी कोणकोणत्या निकषांवर अधिक काम करावे लागणार आहे.

**- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

06 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान-तंत्रज्ञान विषयातील संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा कल

## पाच वर्षांत विज्ञान-तंत्रज्ञानामध्ये ६५९, तर मानव्यशास्त्रामध्ये ४६४ जणांची पीएच.डी.

कोल्हापूर : वैभव गोंधळी

शिवाजी विद्यापीठाचे संशोधनपूरक धोरण, आर्थिक पाठबळ, मार्गदर्शकांची वाढलेली संख्या आणि कॉर्पोरेट क्षेत्रात गुणवत्तेच्या संशोधनाला वाढलेली मागणी यामुळे विद्यापीठातील संशोधनाचा आलेख सातत्याने उंचावत आहे. पीएच.डी.साठी संशोधन करताना विद्यार्थ्यांचा विज्ञान-तंत्रज्ञान शाखेतील विषयांकडे कल कायम आहे. गेल्या ५ वर्षांतील १३०८ पीएच.डी.धारकांपैकी ६५९ जणांनी विज्ञान-तंत्रज्ञानसंबंधी विषयांमध्ये, तर ४६४ जणांनी मानव्यशास्त्रामध्ये संशोधन केले आहे.

पीएच.डी. केल्यानंतर अध्यापनाबरोबरच खासगी, संशोधन आणि सेवा क्षेत्रात करिअरच्या संधी संशोधनकर्त्यांना उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा मोठा



भाग - 2

लाभ संशोधनकर्त्यांना होत आहे. पीएच.डी. करताना शाखा आणि विषय निवडणे महत्त्वाचे असते. पीएच.डी. करणाऱ्यांमध्ये नेहमीच प्राध्यापकांची संख्या चांगली असते; मात्र विज्ञान-तंत्रज्ञानासंबंधीच्या विषयांमध्ये संशोधन केल्याने करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होतात. त्यामुळे या विषयांमध्ये पीएच.डी. करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो

**पाच वर्षांतील पीएच.डी.धारकांची विविध शाखांतील संख्या**

| विज्ञान-तंत्रज्ञान | कॉमर्स-मॅनेजमेंट | मानव्यशास्त्र | आंतरविद्याशाखीय विषय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १३१ | १८ | १०० | १२ | २६१ |
| १६८ | २३ | १३१ | ३० | ३५२ |
| ९६ | १० | ५९ | ६ | १७१ |
| ११५ | १६ | ७३ | २० | २२४ |
| १४९ | ३४ | १०१ | १६ | ३०० |
| ६५९ | १०१ | ४६४ | ८४ | १३०८ |

पुढारी

# देशातील आघाडीच्या २०० संस्थामध्ये शिवाजी विद्यापीठ



- 'एनआयआरएफ'मध्ये सुधारणा
- केंद्रीय शिक्षा मंत्रालयाकडून क्रमवारी जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२३) मध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान कायम राखले आहे. अशी माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी २०२३ ची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी जाहीर केली. पहिल्या वर्षी २०१६ मध्ये क्रमवारीत देशातील ३ हजार ५६५ तर गतवर्षी ५ हजार ५४३ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ १०१-१५० या बँडमध्ये होते. यवर्षी २०२३ मध्ये देशभरातील ८ हजार ६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या. यात शिवाजी विद्यापीठाने १५१-२०० बँडमध्ये देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान मिळविले आहे.

राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधनपर व व्यावसायिक कृतिशीलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय या निकषांवर क्रमवारी आधारित आहे.

> "राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या क्रमवारीमध्ये सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत वाढून सुद्धा शिवाजी विद्यापीठाचे क्रमवारीतील स्थान फारसे विचलित झालेले नाही. वाढणारी स्पर्धा व बदलते निकष पाहता विद्यापीठाचे स्थान उंचावण्यासाठी कोणकोणत्या निकषांवर अधिक काम करावे लागेल, याबाबत संबंधित घटकांना बरोबर घेऊन काम करण्यात येईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याबरोबरच संशोधन संस्था, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर व नियोजन, वैद्यकीय, दंतवैद्यकीय, कायदा, कृषी व कृषिपूरक क्षेत्रे आणि नावीन्यता या क्षेत्रांतील शैक्षणिक संस्थांचा क्रमवारीत समावेश आहे.

जनसपर्क कक्ष
0 6 JUN 2023
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनी प्लास्टिक कचरा संकलन

## विद्यापीठाच्या उपक्रमात अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

संयुक्त राष्ट्रसंघाने यावर्षी आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त 'बीट प्लास्टीक पोल्युशन (प्लास्टीक प्रदूषणास हरवू या) ही प्रबोधन थीम घेतली आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय इमारतीसह सर्व अधिविभाग, विभाग, रहिवासी संकुले आदी परिसरातील प्लास्टीक कचरा संकलित केला. प्लास्टीकचे रॅपर, पेन, रिफील, बाटल्या, पिशव्या अशा प्रकारचा कचरा संकलित केला.

कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात सर्व शिक्षक,



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनी प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देताना प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी.

अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने उपक्रमाचे नियोजन केले.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, नागरी वावर असलेल्या परिसरात प्लास्टीक कचऱ्याचे प्रमाण अधिक आढळले. त्यामुळे नागरिकांनी, विशेषत: विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लास्टीकचा वापर शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे विद्यापीठाने ठिकठिकाणी ओला व सुका कचरा संकलनासाठी ठेवलेल्या कुंड्यांचा वापर करावा. विद्यापीठाचा परिसर प्लास्टीकमुक्त राहावा, यासाठी केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता, सर्वांनी कायमची सवय लावून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

पुढारी

# निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरणपूरक जीवन जगणे आवश्यक : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माणूस निसर्गाचे अपरिमित नुकसान करून पृथ्वीला विनाशाकडे घेऊन जात आहोत. त्यामुळे निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरणपूरक जीवन जगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयातंर्गत महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेत मपर्यावरण अनुकूल राहणीमान आणि पर्यावरणपूरक कौशल्य आधारित प्रयोगफ विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, मानवाने स्वार्थी प्रवृत्तीने स्वतःच्या स्थैर्य व सुरक्षिततेसाठी निसर्गाचा नियम मोडला. निसर्ग आणि जीवसृष्टी सगळ्यांसाठी तयार झाली आहे. निसर्गाची लयलूट करून भौतिक सुखाच्या मागे लागून आपले जीवन सुखाचे बनवत आहोत हा विचार गैर आहे. यातून पृथ्वीला आपण विनाशाच्या उंबरठ्यावर घेऊन जात आहोत. पर्यावरण पूरक जीवन जगण्याचा विचार आपण केला पाहिजे. तरच पर्यावरणाची हानी टाळू शकतो. मालमत्ता व संपत्ती आहे म्हणून निसर्गाची लूट करू नये, असे डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. सचिन भोसले यांनी केले. सूत्रसंचालन वैभव पाटील यांनी केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठात प्लास्टिक कचरा संकलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात प्लास्टिक कचरा संकलन करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने या वर्षी आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त 'बीट प्लास्टिक पोल्युशन' (प्लास्टिक प्रदूषणास हरवू या) ही प्रबोधन थीम घेतली आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठामध्येही सोमवारी प्रशासकीय इमारतीसह सर्व अधिविभाग, रहिवासी संकुले आदी परिसरातील प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग दर्शवला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने उपक्रमाचे नियोजन केले होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नागरी वावर असलेल्या परिसरात प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण अधिक आढळले. त्यामुळे नागरिकांनी, विशेषतः विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लास्टिकचा वापर शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे विद्यापीठाने ठिकठिकाणी ओला व सुका कचरा संकलनासाठी कुंड्या ठेवलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारचा कचरा टाकण्यासाठी त्यांचा वापर करावा.

0 6 JUN 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणपूरक जीवन जगा : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माणूस निसर्गाचे अपरिमित नुकसान करून पृथ्वीला विनाशाकडे घेऊन जात आहे. त्यामुळे निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरणपूरक जीवन जगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयांतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या 'पर्यावरण अनुकूल राहणीमान आणि पर्यावरणपूरक कौशल्य आधारित प्रयोग' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, मानवाने स्वार्थी प्रवृत्तीने स्वतःच्या स्थैर्य आणि सुरक्षिततेसाठी निसर्गाचा नियम मोडला. निसर्ग आणि जीवसृष्टी सगळ्यांसाठी तयार झालेली आहे. त्यामध्ये माणसाने स्वार्थ पाहिला. त्यामुळे मानवाने निसर्गाला लुबाडणे सुरू केले. अन्न, पाणी आणि हवा या तीन गोष्टींची मानवाला जगण्यासाठी आवश्यकता आहे. त्यांचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अन्नाची नासाडी, पाण्याचा मुबलक वापर व वृक्षतोड या गोष्टी टाळल्या पाहिजेत. यावेळी उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. सचिन भोसले यांनी केले. सूत्रसंचालन वैभव पाटील यांनी केले. आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

पुढारी

# पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिक कचरा संकलन

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात प्लास्टीक कचरा संकलन करण्यात आले. 'बीट प्लास्टिक पोल्यूशन' ही प्रबोधन थीम घेतली आहे. या उपक्रमांतर्गत प्लास्टिकचे रॅपर, पेन, रिफील, बाटल्या, पिशव्या अशा प्रकारचा कचरा संकलित करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या उपक्रमात सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी सहभाग झाले होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने उपक्रमाचे नियोजन केले.

पुढारी



शिवाजी विद्यापीठातील त्यांच्या अश्वारूढ भव्य पुतळ्यास अशी आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे.

पुढारी

# विद्यापीठात आज शिवस्वराज्य दिनानिमित्त व्याख्यानांचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभागाच्या वतीने शिवस्वराज्य दिनानिमित्त मंगळवारी (दि. ६) दुपारी ४ वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. 'शिवरायांची स्वराज्याची संकल्पना' विषयावर डॉ. नंदकुमार मोरे, तर 'शिवराज्याभिषेक स्वरूप आणि महत्त्व' या विषयावर प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# बालकल्याण संकुलातील ६० विद्यार्थिनींची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बालकल्याण संकुल येथील ६० विद्यार्थिनींनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांनी विद्यापीठातील अधिविभागांसह विविध ठिकाणांना भेट देऊन माहिती घेतली.

बालकल्याण संकुल येथील विद्यार्थ्यांप्रती सामाजिक बांधिलकी लक्षात घेता, विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातील विविध विभाग व पर्यावरणपूरक उपक्रमाची माहिती होण्याच्या दृष्टीने क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. बालकल्याण संकुल येथील विद्यार्थिनींना विद्यापीठातील लीड बोटानिकल गर्डेन, प्राणीसंग्रहालय, रेशीमशास्त्र तंत्रज्ञान आणि पर्यावरणशास्त्र विभागाची भेट घडवून आणण्यात आली. पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. टी. ठकार, माजी विभागप्रमुख प्रा.डॉ. पी. डी. राऊत यांच्या हस्ते वृक्षांचे रोपण करण्यात आले.

यावेळी पर्यावरणशास्त्र विभाप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठात आज डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय किर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान मंगळवार (दि.६) रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृह इमारतीमध्ये आयोजित केले आहे.

'शिवचरित्रातील काही वादस्थळे' या विषयावर डॉ. रमेश जाधव व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, प्रा. डॉ. एस. एन.पवार प्रमुख उपस्थितीत असतील.

कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा.डॉ. प्रतिमा पवार, डॉ.पी.टी. गायकवाड यांनी केले आहे.

लोकमत

# तेरा हजार जणांनी दिली परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ मधील उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या

परीक्षा सुरु असून सोमवारी बीएस्सी, एलएलबी,बीएड यांसह २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयामध्ये पार पडल्या. या परीक्षांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १३ हजार २४८ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यात २९, सांगलीत १ तर सातारा जिल्ह्यात ७ असे ३७ कॉपीचे प्रकार आढळून आले. ३१ मे रोजी बी.कॉम तृतीय वर्षाची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर विभागाने तत्काळ दुसरी प्रश्नपत्रिका पाठवून परीक्षा घेतली.

तरुण भारत

# बी. कॉम पेपरफुटीचा अहवाल परीक्षा प्रमाद समितीकडे सादर

प्रतिनिधी
कोल्हापूर

- कागदपत्रांची पडताळणीनंतर परीक्षा प्रमाद समिती घेणार अंतिम निर्णय

शिवाजी विद्यापीठातील मार्च–एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील बी. कॉम सेमिस्टर सहाचा ॲडव्हान्स अकौंटन्सीचा पेपर नंबर चारचा पेपर फुटला. अन् कोणत्या कॉलेजवरून पेपर फुटला याची चौकशी करण्यासंदर्भात समिती नेमण्यात आली होती. या समितीने विद्यापीठातील परीक्षा विभागाला दिलेला अहवाल परीक्षा प्रमाद समितीकडे सादर केला आहे. या अहवालातील पुरावे, कागदपत्रे, सीसीटीव्ही फुटेज सर्व गोष्टींची परीक्षा प्रमाद समिती पडताळणी करून निर्णय घेणार आहे. या निर्णयानुसार दहा दिवसानंतर संबंधीत दोषींवर कारवाई केली जाणार आहे.

कोल्हापूर शहरातील एका नामांकित कॉलेजवर पेपरफुटीचा प्रकार घडला. संबंधीत कॉलेजने स्वत:ची चौकशी समिती स्थापन केली आहे. ही समितीकडून चौकशी सुरू आहे. तरीही विद्यापीठातील परीक्षा प्रमाद समितीचा निर्णय अंतिम राहणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा २५ मेपासून सुरू झाल्या आहे. आवघ्या बारा दिवसात २०० कॉपीचे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे कॉपी केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी परीक्षा प्रमाद समितीच करणार आहे. कॉपीबहद्दरांना काय शिक्षा होणार याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पुढारी



# उन्हाळी सत्र परीक्षेत २०७ हून अधिक गैरप्रकार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रातंर्गत पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी कार्यक्षेत्रातील १३ हजार २४८ विद्यार्थी उपस्थित होते. आजअखेर २०७ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे.

विद्यापीठ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २५ मे पासून सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स), बॅचलर ऑफ लॉ, बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ सायन्स (शुगर टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ व्होकेशन, बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ फूड सायन्स, बॅचलर ऑफ व्होकेशन आदी २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या आहेत. भरारी पथकाने कोल्हापूर -२९, सांगली-१, सातारा-७ अशा ३७ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद केली आहे. त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई केली जाईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षांत ३७ गैरप्रकार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ मेपासून सुरू आहेत. सोमवारी २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये घेण्यात आल्या.

दिवसभरात कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्ये ३७ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली. या परीक्षांसाठी १३,२४८ विद्यार्थी उपस्थित होते, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

सकाळ

# पदवी परीक्षेत ३७ 'कॉपी' केसेस

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध २३ पदवी अभ्यासक्रमांच्या सोमवारी परीक्षा झाल्या. त्यासाठी एकूण १३२४८ विद्यार्थी उपस्थित होते. या दरम्यान विद्यापीठाने नियुक्त केलेल्या भरारी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये एकूण ३७ विद्यार्थी 'कॉपी' करताना सापडले. त्यात कोल्हापुरातील २९, सांगलीमधील एक आणि सातारा जिल्ह्यातील ७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.